# सर्वसाधारण सभा

दि. २९/१०/२०२३ वार : रविवार

ठिकाण:-प्रधान कार्यालय, मॉडेल कॉलनी,पुणे

वेळ:- दुपारी २:३० वाजता.

**उपस्थिति:-**

| | | |
|---|---|---|
| १.श्री.राजगोपालजी बं. मालपाणी | २.श्री.गिरीधारीजी वि.भुतडा | ३.श्री.माणकचंदजी काबरा |
| ४.श्री.मिश्रीलालजी झंवर | ५.श्री.रमेशजी धूत | ६.श्री.राजीवजी मुंद्रा |
| ७.श्री.नंदकिशोरजी राठी | ८.श्री.पुरूषोत्तमजी लोहिया | ९.श्री.बजरंगी लोहिया |
| १०.श्री.मनोजजी वि.कासट | ११.श्री.श्रीकांतजी लखोटीया | १२.दिलिपजी शि.कासट |
| १३.श्री.सुयोगजी नरेशजी नवाल | १४.श्री.लक्ष्मीनारायणजी मुंदडा | १५.डॉ.शामसुंदरजी चांडक |
| १६.श्री.गोपालजी लोया | १७.श्री.सुरेशजी मु.नावंदर | १८.श्री.सुभाषजी रा.जाजु |
| १९.श्री.माणकचंदजी बाहेती | २०.श्री.संजयजी जाखोटीया | २१.श्री.कैलासजी ह.सिकची |
| २२.श्री.राजेंद्रजी आसावा | २३.श्री.लक्ष्मीकांतजी नावंदर | २४.श्री.अमोलजी करवा |
| २५.श्री.अनुपजी बियाणी | २६.श्री.नयनजी नोगजा | २७.श्री.ओमप्रकाशजी सोमाणी |
| २८.श्री.अतुलजी तोष्णीवाल | २९.श्री.प्रमोदजी भुतडा | ३०.श्री.उज्वलजी तापडिया |
| ३१.श्री.राजेंद्रजी मंत्री | ३२.श्री.रविजी काबरा | ३३.श्री.प्रितमजी करवा |
| ३४.श्री.राजेंद्रजी डागा | ३५.श्री.रामप्रसादजी राठी | ३६.श्री.मनिषजी भट्टड |
| ३७.श्री.अशिषजी बिहाणी | ३८.श्री.दर्शनजी मुंदडा | ३९.श्री.योगेशजी बजाज |
| ४०.श्री.सुशिलकुमारजी राठी | ४१.श्री.चिरागजी पु.राठी | ४२.श्री.योगेशजी बियाणी |
| ४३.श्री.सचिनजी भट्टड | ४४.श्री.अभिषेकजी सारडा | ४५.श्री.ओमप्रकाशजी कासट |
| ४६.श्री.बालकृष्णजी करवा | ४७.श्री.मनिषजी कासट | ४८.श्री.नंदकिशोरजी काबरा |
| ४९.श्री.दर्शनजी पी.मुंदडा | ५०.श्री.मधुसुदनजी सारडा | ५१.श्री.जगदिशजी लड्डा |
| ५२.श्री.योगेशजी बजाज | ५३.श्री.योगेशजी ल.जाजु | ५४.श्री.मनिषजी सोमाणी |
| ५५.श्री.महेशजी इंदाणी | ५६.श्री.राजेंद्रजी गं.सारडा | ५७.श्रीमती निर्मलाजी लाहोटी |
| ५८.सौ.स्वातीजी मुंदडा | ५९.सौ.नम्रताजी जाजु | ६०.सौ.संगिताजी लाहोटी |
| ६१.सौ.लताजी लाहोटी | ६२.सौ.शीलाजी जाजु | ६३.सौ.मालतीजी चांडक |
| ६४.सौ.मीनाजी भक्कड | ६५.सौ.शोभाजी कासट | ६६.श्रीमती पद्माजी धूत |
| ६७.सौ.प्रतिभाजी काबरा | ६८.सौ.रेखाजी मंत्री | ६९.सौ.वंदनाजी मुंदडा |
| ७०.सौ.आशाजी भुतडा | ७१.सौ.पुष्पाजी गो.राठी | ७२.श्रीमती.शामलजी तोष्णीवाल |
| ७३.श्रीमती कांताजी काबरा | ७४.सौ.किर्तीजी लड्डा | ७५.सौ.संगिताजी मुंदडा |
| ७६.सौ.मिनाक्षीजी सारडा | ७७.श्री.कृष्णकांतजी लखोटिया | ७८.श्री.अमोलजी भट्टड |
| ७९.श्री.शेखरजी मुंदडा | ८०.सौ.सुशिलाजी राठी | ८१.श्री.अतुलजी लाहोटी |
| ८२.श्री.अश्विनजी चांडक | ८३.श्री.जुगलकिशोरजी पुंगलिया | |

माहेश्वरी विद्या प्रचारक मंडळाची सर्वसाधारण सभा दि.२९.१०.२३ रोजी वरील सदस्यांच्या उपस्थितीत सुरू करण्यात आली. मंडळाच्या सचिव सौ.सुशिलाजी राठी यांनी सर्वांचे स्वागत केले व मंडळाचे अध्यक्ष श्री.अतुलजी लाहोटी यांना सभेचे

अध्यक्षस्थान स्विकारण्याची विनंती केली. येणेप्रमाणे श्री.अतुलजी लाहोटी यांनी सभेचे अध्यक्ष स्थान स्विकारून पुनश:च सर्वांचे स्वागत केले. मंडळाच्या सचिव सौ.सुशिलाजी राठी यांनी सांगीतले की, मंडळाच्या प्रथेप्रमाणे सभेच्या सुरूवातीला मंडळाच्या अहवाल वर्षात दिवंगत सदस्य, कार्यकर्त्यांना श्रध्दांजली अर्पित करू. येणेप्रमाणे खालील दिवंगत व्यक्तिंना श्रध्दांजली अर्पित करण्यात आली.

**शोकप्रस्ताव – १०.०४.२३ ते २८.१०.२०२३**

| अ.क्रं | शोकप्रस्ताव भेजा हुआ दि, | शोकप्रस्ताव भेजा उनका नाम | गांव | रिश्ता | मृत व्यक्ति नांम |
|---|---|---|---|---|---|
| १ | १०.०४.२०२३ | श्री.सुरेशजी बलदवा<br>श्री.नंदकिशोरजी बलदवा | सोलापूर | माताजी | स्व.श्रीमती गोपीबाई रामकिसनजी बलदवा, सोलापूर |
| २ | १०.०४.२०२३ | सौ.आशाजी भुतडा | सोलापूर | माताजी | स्व.श्रीमती गोपीबाई रामकिसनजी बलदवा, सोलापूर |
| ३ | १४.०४.२०२३ | श्रीमती स्नेहलताजी लोया | पुणे | पती | स्व.ओमप्रकाशजी लोया, पुणे |
| ४ | २५.०४.२०२३ | सौ.प्रतिमाजी सारडा | पुणे | जेठजी | स्व.शेखरजी बद्रिनारायणजी सारडा,पुणे |
| ५ | २५.०४.२०२३ | सौ.सीमाजी बंग | पुणे | भाई | स्व.शेखरजी बद्रिनारायणजी सारडा,पुणे |
| ६ | २५.०४.२०२३ | श्री.सागरजी सारडा<br>श्री.क्षितिजजी सारडा | पुणे | पिताजी | स्व.शेखरजी बद्रिनारायणजी सारडा,पुणे |
| ७ | २७.०६.२०२३ | श्री.दिलिपजी मालपाणी | पुणे | माताजी | स्व.श्रीमती शोभनाबाई मालपाणी, मुंबई |
| ८ | ०२.०९.२०२३ | श्री.चंद्रकांतजी करवा | बार्शी | माताजी | स्व.सौ.सरस्वतीबाई रूपचंदजी करवा, बार्शी |
| ९ | ०२.०९.२०२३ | श्रीमती शामलजी तोष्णीवाल | पुणे | दादीजी | स्व.सौ.सरस्वतीबाई रूपचंदजी करवा, बार्शी |
| १० | १२.०८.२०२३ | श्री.मनोजजी कासट<br>सौ.वर्षाजी कासट | पुणे | माताजी<br>सासुजी | स्व.श्रीमती निलादेवी विठ्ठलदासजी कासट, पुणे |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ११ | ०८.०९.२०२३ | श्री.आदित्यजी बिर्ला | पुणे | पिताजी | स्व.श्री.अभयजी बिर्ला, पुणे |
| १२ | ०८.०९.२०२३ | श्री.गिरिधरजी काले | पुणे | माताजी | स्व.कावेरीबाई श्रीनिवासजी काले, अहमदपूर |
| १३ | १२.०९.२०२३ | श्री.भरतजी सोमाणी | पुणे | दादीजी | स्व,श्रीमती शांताबाई रामनारायणजी सोमाणी, अहमदनगर |
| १४ | १८.०९.२०२३ | श्री.मुकुंदजी भुतडा | पुणे | धर्मपत्नी | स्व,सौ.सुरेखाजी मुकुंदजी भुतडा, पुणे |
| १५ | ०४.१०.२०२३ | श्री.अमितजी लड्ढा<br>श्री.अंकितजी लड्ढा | पुणे | पिताजी | स्व.श्री.शिवप्रसादजी लड्ढा, पुणे |
| १६ | १६.१०.२०२३ | श्रीमती मालाजी चांडक<br>श्री.प्रकाशजी चांडक<br>श्रीमती विणाजी चांडक | पुणे | बेटे<br>भाई<br>पती | स्व.दीपकजी अनिलकुमारजी चांडक, अमरावती |
| १७ | २३.१०.२०२३ | श्री.सचिनजी मंत्री | पुणे | माताजी | स्व.सौ.मनीषाजी प्रभाकरजी मंत्री , पुणे |
| १८ | २५.१०.२०२३ | सौ.तनुजाजी लड्ढा | पुणे | माताजी | स्व.सौ.मनीषाजी प्रभाकरजी मंत्री , पुणे |

यानंतर मंडळाचे अध्यक्ष श्री.अतुलजी लाहोटी यांनी आपले मनोगत व्यक्त केले त्यांनी प्रस्तूतीकरणाच्या माध्यमातून प्रत्येक ॲक्टीव्हिटीची माहिती सभेला दिली. त्यांनी सांगीतले की, मंडळाची ही ९४ वी सर्वसाधारण सभा आहे. आपल्या समाजाची एकमेव अशी संस्था आहे जी सेवा शिक्षणाच्या क्षेत्रात एवढी प्रदीर्घ सेवा देत आहे. निश्चितच हे श्रेय आहे. कार्यकर्ता, दानदाता व हितचितकांचे मंडळाच्या स्थानिय समित्या, विश्वस्त मंडळ, जी.सी समिती यांचे योगदानानेच शक्य झाले आहे. संस्थेचे वटवृक्षामध्ये रूपांतर झाले आहे. लवकरच मंडळ आपले शताब्दी वर्ष साजरा करणार आहे. मंडळाचे ३८५ कार्यकर्ते अहोरात्र मेहनत करत आहेत. त्यामुळे संस्थेची प्रगती नक्कीच इतर संस्थासाठी आदर्श ठरणार आहे.

मंडळाने आपले कार्य केवळ शाळा, हॉस्टेल, बालभवन पुरते मर्यादित न ठेवता काळानुरूप आवश्यकता सर्वसमावेश उपक्रमांना हाती घेऊन विद्यार्थ्यांचे व समाजाचे हित साधण्याचे कार्य मंडळ करत आहे. अनेकानेक प्रकल्प योजना मंडळातर्फे सुरू केल्या गेल्या आहेत.

सभाध्यक्षांनी प्रेझेंटेशनच्या माध्यमातून एरोली गर्ल्स हॉस्टेल, लाहोटी विद्यार्थीभवन, महेश विद्यालय, सोलापूर येथे सीबीएसई स्कुल, श्रीमती ल.ला.मुंदडा विद्यार्थी भवन पुर्नविकास प्रकल्प, लॅपटॉप वितरण, ग्लोबल स्टार, सेतू, इंटरनॅशनल कनेक्ट, कर्वेनगर निरंतर हॉस्टेल, ॲल्युमिनी ब्लड डोनेशन कॅम्पेन, द्रोणालया, अनमोल रतन, स्कॅालरशीप, मंडळ संचलित शाळांचे निकाल, प्रिस्कुल, सस्टेनॅबिलिटी, फायनान्स कनेक्ट इत्यादी उपक्रम व प्रकल्पांची माहिती दिली.

यानंतर सभेस विषयानुरूप सुरूवात करण्यात आली.

**विषय क्र.१:– मंडल की सर्वसाधारण सभा दि. ०९.०४.२०२३ के इतिवृत्त को मंजुर करना ।**

सभाध्यक्ष श्री.अतुलजी लाहोटी यांनी सभेला सांगितले की, मागील सभेचा कार्यवृत्तांत सर्वांना दिलेला आहे. तसेच सदर कार्यवृत्तांत संस्थेच्या वेबसाईटवर उपलब्ध करून देण्यात आला होता. तो आपण वाचलास असेल. त्यात काही दुरूस्ती किंवा सुचना असल्यास सुचवाव्यात. येणेप्रमाणे सदर कार्यवृत्तांत दुरूस्ती व सुचना नसल्याने मागील सभेचा कार्यवृत्तांत सर्वानुमते मंजुर करण्यात आला.

सुचकः– सौ.किर्तीजी लड्ढा
अनुमोदकः– श्री.सुरेशजी मु.नावंदर

**विषय क्र.२:– वर्ष २०२२–२०२३ के ऑडीटेड आय व्यय पत्र तथा तुलन पत्रको स्वीकृती देना ।**

**व**

**विषय क्र.३:– वर्ष २०२३–२०२४ के वित्त संकल्प की जानकारी लेकर स्वीकृती देना ।**

मंडळाचे कोषाध्यक्ष श्री.अमोलजी भट्टड यांनी सभेसमोर वर्ष २०२२–२०२३ चा ऑडीटेड आयव्यय व तुलनपत्र तसेच वर्ष २०२३–२०२४ चा अर्थ संकल्प सभेसमोर प्रस्तुत केला तो खालील प्रमाणे .

# MVPM Financial Statement Net Surplus/deficit & Budget FY.2023-24

| Sr.No. | Unit Name | Audited FY 22-23 | Budgeted 2023-24 |
|---|---|---|---|
| A | Maheshwari Vidya Pracharak Mandal | -97.21 | -221.20 |
| B | V.N.Lahoti Vidyarathi Bhavan | 92.19 | 13.33 |
| C | RBHR Rathi Vidyarathi Bhavan | 58.44 | 63.39 |
| D | H.R. Rathi Vidyarathi Bhavan | 94.97 | 72.36 |
| E | L.L.Mundada Vidyarathi Bhavan | 67.47 | 44.98 |
| F | Murlidhar Sarda Vidyarathi Bhavan | -6.81 | -2.80 |
| G | Laxmi Hostel (Rented Property,Pune) | 50.18 | 30.68 |
| H | Baner Hostel (Rented Property,Pune) | 32.11 | 8.33 |
| I | Nirantar Hostel (Rented Property,Pune) | 1.94 | 12.65 |
| **B to I** | **Total All Hostel** | **390.50** | **242.92** |
| J | Mahesh Vidyalaya Marathi Medium,Pune | 31.78 | 26.84 |
| K | Mahesh Vidyalaya English Medium,Pune | 104.83 | 113.21 |
| L | Mahesh Bal Bhavan, Pune | 21.68 | 7.96 |
| M | Damani Marathi School, Solapur | 30.47 | 9.91 |
| N | Chandak English School, Solapur | 170.32 | 120.01 |
| O | Deshbhakha H. B. Soni Collage | -28.39 | 11.90 |
| **J to O** | **Total All School** | **330.71** | **289.82** |
| | **Grand Total Surplus (Defecit)** | **624.01** | **311.54** |

## AUDITED FINANCIAL

**Amount in Rs. Lacs**

| Particulars | FY 20-21 | FY 21-22 | FY 22-23 |
|---|---|---|---|
| Gross Receipts | 1,758 | 2,266 | 3,283 |
| Net Surplus | 175 | 474 | 624 |
| FD Closing Balances | 2,057 | 1,920 | 3,357 |
| Capital Expenditure | 642 | 1,005 | 675 |
| Donation Received | 198 | 411 | 484 |

## Scholarships & Others

Amount in Rs. Lacs.

| Particulars | FY 20-21 | FY 21-22 | FY 22-23 |
|---|---|---|---|
| **Scholarship Corpus Fund** | 572 | 619 | 777 |
| **Scholarship Distribution** (includes Hostel Freeship , Swavlamban, Civil Services) | 80 | 148 | 199 |
| **Manakbhau Kabra Kosh** (Asahaya Vyakti Sahayata) | 33 | 33 | 59 |
| **Asahaya Vyakti Sahayata Distribution** | 9 | 9 | 9 |

यांनी सांगितले की, मागील वर्षी कोरोनामुळे चॅलेन्जेस भरपूर होते. हॉस्टेलस् चा प्रॉफीट देखील कोरोनामुळेच कमी झाला आहे. परंतु हे सर्व आता पुर्व पदावर येत आहे. त्यामुळे पुढील वर्षी नक्कीच चित्र वेगळे दिसणार आहे.

सर्वसाधारण सभेने आयव्यय व तुलन पत्र तसेच अर्थसंकल्पावर विस्तृत चर्चा करून त्यास मंजूरी दिली त्याचा ठराव खालील प्रमाणे.

**ठराव:-** माहेश्वरी विद्या प्रचारक मंडळाच्या वर्ष २०२३-२०२४ चे ऑडीटेड आयव्यय पत्र व तुलन पत्र तसेच वर्ष २०२३ - २०२४ चा अर्थसंकल्पास आजची सर्व साधारण सभा एकमताने मंजुर करून त्यास स्वीकृती देत आहे.

सुचक:- श्री.अनुपजी बियाणी
अनुमोदक:- श्री.सचिनजी भट्टड
ठराव:- सर्वानुमते मंजुर

**विषय क्र.४:- मंडल के कायम विश्वस्त श्री.जुगलकिशोरजी मुंदडा व्दारा प्राप्त इस्तिफे पर विचार कर उनके व्दारा सुचित नाम (व्यक्ति) को कायम विश्वस्त पदपर नियुक्त करना ( घटना कलम ११ अ (उ) अनुसार) ।**

मंडळाचे अध्यक्ष श्री.अतुलजी लाहोटी यांनी सभेस माहिती दिली की, मंडळाचे कायम विश्वस्त श्री.जुगलकिशोरजी मुंद्रा यांनी मंडळाची प्रदिर्घ सेवा केलेली आहे. श्रीमती ल.ला.मुंदडा विद्यार्थी भवन चे मुख्य दानदाता परिवारातील ते सदस्य असून त्यांनी मंडळाच्या विश्वस्त पदावर राहून मंडळाच्या कार्यामध्ये हिरारीने भाग घेऊन कार्य करत राहीले आहेत. विशेषत: एरोली वसतिगृहाचा प्लॉट सिडको कडून प्राप्त करण्यामध्ये त्यांचा प्रमुख सहभाग राहीला आहे. तसेच त्याठिकाणी दानदाते मिळविण्यासाठीही ते प्रयत्नशील राहीले आहेत. आता त्यांच्या प्रकृती अस्वस्थतेमुळे त्यांना डॉक्टरांनी रेस्ट घेण्याचे सांगीतले आहे. त्यामुळे त्यांनी त्यांच्या विश्वस्त पदाचा राजीनामा मंडळाकडे पाठविला असून त्यांनी मंडळ संविधान कलम ११ अ (उ) च्या अंतर्गत त्यांच्या परिवारातील व त्यांचे सुपुत्र श्री.राजीवजी मुंद्रा यांचे नाव मंडळाच्या कायम विश्वस्त पदावर नियुक्तीसाठी सुचविले आहे. श्री.राजीवजी मुंद्रा हे प्रोफेशनने सी.ए.आहेत. मंडळाच्या श्रीमती ल.ला.मुंदडा विद्यार्थी भवनाच्या स्थानिय

समितीवर ते अध्यक्ष राहीले आहेत. त्यांना मंडळाची माहीती व कार्यांचा अनुभव आहेत. तसेच सदर पदावर कार्य करण्यास उत्सुक हे आहेत म्हणून आजच्या सभेने सदर राजीनाम्यावर विचार करून मंडळाच्या कायम विश्वस्त पदावर श्री.राजीवजी मुंदडा यांची नियुक्ती करणे संदर्भात विचार करावा.

सर्वसाधारण सभेत चर्चा करण्यात आली कि, श्री.जुगलकिशोरजी मुंद्रा यांची प्रकृती अस्वस्थतेमुळे त्यांनी कायम विश्वस्त पदाचा राजीनामा मंडळाकडे सादर केलेला आहे. त्यामुळे मंडळ संविधान कलम ११ अ (उ) अनुसार त्यांनी त्यांच्या परिवारातील सुचविलेले नाव (व्यक्ती) श्री.राजीवजी मुंद्रा यांना मंडळाच्या कायम विश्वस्त पदी नियुक्ती करावी व यासंदर्भात मा.धर्मादाय आयुक्त कार्यालय येथे बदल अर्ज दाखल करून सदर नोंद ही शेड्युल १ ला करण्यात यावी. यासंदर्भात खालील ठराव पारित करण्यात आला.

**ठराव:–** माहेश्वरी विद्या प्रचारक मंडळाचे स्व श्रीमती ल.ला.मुंदडा दानदाता परिवार, ठाणे या परिवारातील कायम विश्वस्त श्री.जुगलकिशोरजी मुंद्रा यांनी त्यांच्या प्रकृती अस्वस्थतेमुळे सदर पदाचा राजीनामा मंडळाकडे सादर केलेला असून सदर राजीनामा आजची सर्वसाधारण सभा स्विकृत करत असून मंडळाचे संविधान कलम ११ अ (उ) अनुसार त्यांच्या परिवारातील त्यांनी सुचविलेले नाव (व्यक्ति) श्री.राजीवजी मुंद्रा यांची त्यांच्या जागेवर मंडळाच्या कायम विश्वस्त पदी आजची सर्वसाधारण सभा एकमताने नियुक्त करत आहे. यासंदर्भात मा.धर्मादाय आयुक्त यांच्या कडे संस्थेचे वकिल श्री.सागरजी थावरे यांच्यामार्फत बदल अर्ज दाखल करणे, वकीलांचे शुल्क ठरविणे, आवश्यक कागदपत्रांवर सह्या करणे. मा.धर्मादाय आयुक्त कार्यालयामध्ये हिअरींग साठी उपस्थित राहण्याचे व शेड्युल १ वर सदर बदल नोंद करण्यासंदर्भात आवश्यक सर्व अधिकार मंडळाचे विश्वस्त श्री.रमेशजी धूत यांना आजची सर्वसाधारण सभा एकमताने देत आहे. याप्रमाणे कार्यवाही करावी.

सुचक:– श्री.अशिषजी बिहाणी
अनुमोदक:– श्री.बालकृष्णजी करवा
ठराव:– सर्वानुमते मंजुर

**विषय क्र.५:– मंडल के पुर्णत्व की ओर चल रहे वि.ना.लाहोटी वि.भवन पुन:निर्माण प्रकल्प एवं नुवाल एंड पनपालिया कन्या छात्रालय ऐरोली प्रकल्प की जानकारी लेना ।**

मंडळाचे उपाध्यक्ष श्री.लक्ष्मीकांतजी नावंदर यांनी वि.ना.लाहोटी वि.भवन प्रकल्पासंदर्भात सभेस माहिती दिली की, गेल्या सर्वसाधारण सभेमध्ये सांगीतल्याप्रमाणे वाढीव ६ व्या मजल्याची परवानगी पुणे महानगरपालिकेकडून घेण्यात आली व काम सुरू करण्यात आले. जवळ जवळ १०,००० स्के फूट चे काम सध्यास्थितीला सुरू आहे. पाचव्या मजल्या वरील काही रूमस् विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या अगोदरच आपण पार्ट कम्प्लिशन देखील घेतले आहे. वाढीव मजल्याचे काम येत्या डिसेंबर पर्यंत पुर्ण करण्याचा प्रयत्न करत आहोत. कारण विद्यार्थी वसतिगृहात राहत असल्यामुळे अनेक अडचणी येत आहेत. परंतु डिसेंबर मध्ये हे काम होईल याची श्वास्ती आहे. आपणांस सांगताना आनंद होत आहे कि, जानेवारी मध्ये आपण या ठिकाणच्या नविन टॉवरचा उद्घाटनाचा कार्यक्रम निश्चित करत आहोत. त्याकरिता आपण वेळ राखीव ठेवावा. तसेच मंडळाचे अनेक प्रकल्प सुरू आहेत म्हणून वसतिगृहाच्या तयार होणा–या रूमस् हॅाल मेस, जिम, स्पोर्ट एरिया साठी दानदाते मिळविण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावे या निमित्ताने सभेला हे आवाहन करतो,

यानंतर मंडळाचे अध्यक्ष श्री.अतुलजी लाहोटी यांनी नुवाल एंड पनपालिया कन्या छात्रावास एरोली येथिल प्रकल्पासंदर्भात माहिती दिली कि, मागील सभेत माहिती देण्यात आली होती कि, सदर वसतिगृहाचे हे पाच मजल्याचे होणार होते परंतू नवी मुंबई महपालिकेच्या बदलेल्या नियमामुळे येथे २ मजले वाढीव मिळाले त्याची परवानगी घेण्यत आली आहे व अनुषंगाने नकाशे तयार करून बांधकाम देखील सुरू करण्यात आले आहे. श्री.दर्शनजी मुंदडा मंडळाचे भूतपूर्व विद्यार्थी आहेत ते तेथिल काम करत आहे. मंडळाकडून मनोज व शुभम त्याठिकाणी आठवड्यातून दोन वेळा जाऊन कामाचा स्टेटस् माहिती करून घेतात. तेथिल विश्वस्त श्री.माणकचंदजी काबरा यांनाही वेळोवेळी माहिती दिली जाते ते पण आवश्यकतेनुसार त्याठिकाणी भेट देतात. लवकरच हा प्रकल्प पूर्ण होणार असून त्यादृष्टीने प्रयत्न सुरू आहेत. येत्या २ ते ३ महिन्यात हा प्रकल्प पूर्ण होईल.

**विषय क्र.६:– मंडल के श्रीमती ल.ला.मुंदडा विद्यार्थी भवन, मुंबई के पुर्ननिर्माण तथा सोलापूर के श्रीमन्नारायण लक्ष्मीनारायण भगवान मंदीर ट्रस्ट व्दार प्राप्त प्लॉट पर उइड्ए स्कुल का निर्माण हेतू जानकारी लेना ।**

मंडळाचे अध्यक्ष श्री.अतुलजी लाहोटी यांनी श्रीमती ल.ला.मुंदडा वि.भवन पुर्ननिर्माण प्रकल्पाबाबत सभेस माहिती दिली की, मंडळाचा ह ड्रिम प्रकल्प आहे. मागील वर्षभरापासून यासंदर्भात मंडळाने सक्रिय कार्यवाही केलेली आहे. आर्किटेक्ट श्री.बर्वे यांच्याकडून आपण प्राथमिक डिझाईन घेतले आहे. सदर डिझाईन घेतले आहे. सदर डिझाईन च्या आभ्यास केल असता याठिकाणी आपण २८ मजली इमारत बांधू शकतो. साधारण १,३०,००० स्के फूट एवढे बांधकाम याठिकाणी होणार आहे. यासंदर्भात आपण मुंबईतील दोन नामवंत आर्किटेक्ट चे डिझाईन घेणार आहोत. पुढील वर्षाच्या सुरूवातीला या प्रकल्पासंदर्भात दिशा ठरवून पुढील कार्यवाही केली जाईल.

यानंतर त्यांनी सोलापूर येथे होणा–या उइड्ए शाळेच्या प्रकल्पासंदर्भात सभेला माहिती दिली की, सोलापूर शहराच्या मध्यभागी अत्यंत प्राईम लोकेशनवर हा प्लॉट आहे. याठिकाणी आर्किटेक्ट व्हिजीट ही करण्यात आल्या आहेत. तसेच रेंट अ‍ॅग्रीमेंट येत्या २/३ महिन्यात करण्यात येईल ते अंतिम टप्यात आहे. तोपर्यंत ३ आर्किटेक्ट डिझाईन देखील घेण्यात येईल. सदर प्रकल्प मंडळासाठी अत्यंत महत्वाचा प्रकल्प आहे. पालक वर्गाची व तेथील समाजाची मागणी लक्षात घेऊन हा प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करू.

**श्री.ओमप्रकाशजी सोमाणी :–** मंडळाच्या दमाणी विद्या मंदीर व स.रा.चंडक महेश इंग्लिश स्कुल शाळेचा सोलापूर शहरामध्ये अत्यंत चांगला नावलैकिक आहे. कारण शैक्षणिक गुणवत्तेमध्ये आपण कुठलीही तडजोड करत नाही. त्यामुळे येणारे सगळे रिझल्ट उत्तम येतात. त्यामुळे आपल्या शाळांना प्रचंड मागणी आहे. कार्यकर्ते समर्पणाने काम करतात. टिचर स्टाफ नियुक्त करतांनाच आपण शैक्षणिक पात्रता व अनुभव बघून नियुक्त करतो. त्यांना वाजवी पगार देता म्हणून हे फळ मिळते. या नविन उइड्ए शाळेच्या प्रकल्पासंदर्भात सांगायचे झाल्यास ज्या पध्दतीने आपले निकाल लागतात त्या अनुषंगाने अनेक पालक मॅनेजमेंटला उइड्ए शाळेसंदर्भात विचारणा करतात. समाजातील मुले शहराच्या बाहेर उइड्ए शाळेत प्रवेश होत आहेत. या सर्व बाबी लक्षात घेता आपण मागील २/३ वर्ष प्लॉट बघत होतो. परंतु काही केल्या प्लॉट मिळत नव्हता. परंतु मंडळाच्या महत्वकांक्षेने तो मिळाला आहे. सोलापूर येथिल कार्यकर्ते याप्रकल्पासाठी उत्साही आहेत. शाळेला पहिल्या वर्षापासून प्रचंड प्रतिसाद मिळेल यावर कुणाचे दुमत नसावे. आता योग्य प्रवाहात आपण आलो आहोत. नक्कीच पुढील २ वर्षात हा प्रकल्प पुर्ण करण्याचा निर्धार आपण यासभेच्या निमित्ताने करूयात.

**विषय क्र.७:– मंडल व्दारा किये जानेवाले लॅपटॉप वितरण, द्रोणालया की जानकारी लेकर सुझाव देना ।**
मंडळाच्या छात्रवृत्ती समितीचे अध्यक्ष श्री.शामसुंदरजी चांडक यांनी सभेस माहिती दिली कि, कोरोनानंतर विद्यार्थ्यांना लॅपटॉपची आवश्यकता ओळखुन गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना आपण लॅपटॉप द्यावा यासंदर्भात मंडळाचे अध्यक्ष श्री.अतुलजी लाहोटी यांनी मंडळाचे विश्वस्त श्री.पुरूषोत्तमजी लोहिया यांच्यकडे पहल केली त्यांनी उदारमनाने १०४ लॅपटॉप देण्याचे ठरविले. त्यानुसार समितीने विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविले व सदर लॅपटॉप वितरित केले गेले.
वर्ष २०२२ ला या उपक्रमाची सुरूवात झाली. यानंतर श्री.राहुलजी राठी यांनी १०० लॅपटॉप महाराष्ट्र प्रदेशने ६१, सौ.अंजलीजी तापडिया यांनी ५०, सौ.किर्तीजी काबरा–५०, सौ.कविताजी तापडिया–१०, असे लॅपटॉप वितरणासाठी दिले. या उपक्रमाअंतर्गत समाजातील उदारमना दानदाते जुळत गेले. आजपर्यंत ३७५ लॅपटॉपचे वितरण झालेले आहे. महाराष्ट्र प्रदेश माहेश्वरी सभेबरोबर काम करतोय. संपूर्ण महाराष्ट्र या योजनेने व्यापला गेला आहे. नुकताच नागपूर येथे लॅपटॉप वितरणाच्या कार्यक्रम पार पाडला. भविष्यातही मोठे वितरण करायचे आहे. आपण ही या योजनेला हातभार लावावा ही इच्छा व्यक्त करतो.

मंडळाचे अध्यक्ष श्री.अतुलजी लाहोटी यांनी द्रोणालया उपक्रमाबाबत माहिती दिली कि, मागील वर्ष भरापासून आपण हा उपक्रम सुरू केलेला आहे. हा १० दिवसाचा रेशीडेंशीयल उपक्रम असून याच्या विविध विषयांवर त्या क्षेत्रातील तज्ञांचे मार्गदर्शन दिले जाते. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम असून याच्यात स्कील डेव्हलपमेंट मोटीव्हेशन इंडस्ट्रियल, फायनान्स, मॅनेंजमेंट, वैद्यकिय, एंटरटेनमेंट, इंटव्हिव्ह प्रिपरेशन अशा विविध विषयी विद्यार्थ्यांना ज्ञान दिले जाते. विद्यार्थ्यांना याचा प्रचंड लाभ होअतो अहे. असा फीडबॅक आहे. कार्यकर्ते देखील अतिशय मेहनत घेतात. यासाठी पेट्रान मेंबर्स आहेत त्याच्यात श्री.अभिजीतजी काबरा, श्री.नितिनजी न्याती, श्री.राहुलजी राठी, श्री.नरेंद्रजी गोयदाणी, श्री.राजेशजी मालपाणी, श्री.राजेंद्रजी तापडिया, श्री.बालकृष्णजी करवा असे तज्ञ मंडळी देखील मार्गदर्शन करतात. अतिशय उत्तम पध्दतीने मागील बॅचेस संपन्न झालेल्या आहेत. भविष्यात याच्यात अनेक बदल करून अजून इफेक्टीव्ह पध्दतीने द्रोणालया राबवायचा आहे.

**विषय क्र.८:– अध्यक्ष की अनुमती से अन्य विषयोपर चर्चा एवं निर्णय ।**

१. मंडळाचे गव्हर्निंग कौन्सील सदस्य श्री मधूसुदनजी सारडा यांनी अहमदनगर येथील वसतिगृहासंदर्भात माहिती दिली कि, याठिकाणी वसतिगृह चालविणे कठिण झाले आहे. शिक्षण घेणारे सगळे विद्यार्थी पुणे–मुंबई कडे जातात. सर्व सोयी देऊन सुध्दा याठिकाणी १६ विद्यार्थी आहेत. नुकतेच आपण रिपेअरींगचे सर्व काम देखील केलेले आहेत. यासंबधी गव्हर्निंग कौन्सील सभेत देखील हि माहिती दिलेली आहे. त्याच्यात याठिकाणी एखादी उइइए शाळा सुरू करू म्हणून ठरले होते. आपण यासंदर्भात प्रस्ताव ही सादर केला परंतू त्यांच्या नॉर्म्स मध्ये उपलब्ध प्लॉट कमी पडतो. म्हणून याठिकाणी प्री–प्रायमरी शाळा सुरू करावी का? याबाबत चाचपणी सुरू आहे.

**श्री.शेखरजी मुंदडा :–** CBSE शाळेसाठी आपण भरपूर प्रयत्न केले विस्तारित अहवाल तयार केला परंतु जागेच्या नॉर्म्स मध्ये न बसल्यामुळे ते रद्द झाले. म्हणून आपण आपले प्रयत्न सुरो ठेवून याठिकाणी प्री–प्रायमरी व प्रायमरी शाळा सुरू करण्याचे प्रयत्न करत आहोत. स्टेट ऑफ द आर्ट शाळा याठिकाणी करायची आहे.

**श्री.नंदकिशोरजी राठी :–** सोलापूरच्या शाळांच्या धरतीवर आपण काम करावे अगदी नॅशनल लेव्हलची शाळा झाली पाहीजे. अशक्य असे काही नाही. त्यादिशेने प्रयत्न करावे व लवकरात लवकर यासंदर्भात पाऊल उचलावे.

२. मंडळ सदस्य श्री. गोपालजी लोया यांनी विचारणा केली कि, मंडळाच्या आजीवन सदस्यत्वासाठी अर्ज करणा–या माहेश्वरी लोकांना मंडळाचे सदस्य का केले जात नाही ? याचे पदाधिका–यांनी उत्तर द्यावे.

**श्री.अतुलजी लाहोटी :–** आजीवन सदस्यत्वासाठी अर्ज करणा–या अर्जदाराला आपण आजीवन सदस्य करत नाही. असा प्रकार झाला नाही. याच्यात सदर अर्जदाराच्या अर्जावर गव्हर्निंग कौन्सील सभेत चर्चा केली जाते व सदर अर्जदाराला मंडळाच्या इतर स्थानिय समित्यांवर काम करण्याची इच्छा लक्षात घेतली जाते. साधारण वर्षभर सदर सदस्याला कार्य करू दिले जाते. मग पुढील प्रक्रिया गव्हर्निंग कौन्सील मार्फत केली जाते. कारण हा गव्हर्निंग कौन्सील सभेचा अधिकार आहे.

**श्री.शेखरजी मुंदडा :–** संस्थेच्या ९४ वर्षाच्या इतिहासात संस्थेने अजीवन सदस्यत्वासाठी आलेल्या अर्जांना स्वीकृती दिली नाही. असे कधीच झाले नाही. काही अर्ज आपण प्रलंबित ठेवले असतील कारण गव्हर्निंग कौन्सील त्याच्यावर विचार मंथन करत असेल अर्जदारांना मंडळाच्या कार्याची माहिती नसल्यास त्यांना काम करण्याची संधी देण्यात येईल. परंतू आजीवन सदस्यत्व देणार नाही असे होणार नाही. यासाठी संपूर्ण केली प्रक्रिया आहे. पुढील जी सी मध्ये सदर अर्जदारांवर विचार विनिमय करून निर्णय घेऊ.

**श्री.नंदकिशोरजी राठी :–** दोन तीन वर्षापूर्वी आपण आजीवन सदस्यत्व देणे थांबवले होते. घटनेत बदल झाल्यानंतर लगेचच आपन त्यांना स्वीकृती दिली म्हणून आता ते कुठले अर्ज आले असतील ते केवळ प्रलंबित ठेवण्यात आले आहेत. याचा अर्थ ते रिजेक्ट झाले असे नाही. सदर अर्जदारांनी मंडळाचे कल्चर समजून घ्यावे. सक्रियता दाखवावी नंतर त्यांना स्वीकृती गव्हर्निंग कौन्सील सभा देईलच.

यानंतर सभेत सर्वसामावेशक चर्चा झाली व सदर प्रलंबित अर्जांवर गव्हर्निंग कौन्सील सभेने सकारात्मक विचार करून निर्णय घ्यावा असे ठरले.

यानंतर ऐनवेळी येणा–या विषयामध्ये कुठलाही विषय नसल्याने कार्याध्यक्ष श्री.शेखरजी मुंदडा यांनी सगळयांचे आभार मानुन सभा संपल्याचे जाहीर केले.

**सभाध्यक्ष**